**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१५४५८२६ /२०२४ पिंपरी-चिंचवड          दिनांक- १८ /११/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

विधानसभा सार्वत्रीक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत विधानसभा निवडणुक मतदान प्रक्रिया दिनांक २०/११/२०२४ रोजी पार पडणार आहे. काही मतदान केंद्रावर बुथची संख्या जास्त आहे. अशा मतदान केंद्रावर मतदारांच्या वाहनांची ये-जा जास्त असल्याने वाहतूक कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी अशा मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरळित पार पडणेकरीता सदर ठिकाणचे वाहतुक मार्गात बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### तळवडे वाहतुक विभाग अंतर्गत

१) देहूगाव मुख्य कमान ते परंडवाल चौक हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:** १.देहूकमान चौकाकडुन परंडवाल चौकाकडे जाणारी वाहतूक कंद पाटील चौकमार्गे परंडवाल चौकाकडे जातील

**पर्यायी मार्ग:** २. परंडवाल चौकाकडुन देहूगाव मुख्य कमान चौकाकडे जाणारी वाहतूक अंतर्गत रस्त्याने इच्छितस्थळी जातील.

### सांगवी वाहतूक विभाग अंतर्गत

१) गोविंद गार्डन ब्रीजकडुन जी.के.गुरुकुल इंन्टरनॅशल स्कुल समोरुन व्हिबगेर चौकात जाण्या येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** - सदरची वाहने पी.के.चौकातुन लेफ्ट टर्न घेवुन कुंजीर चौकातुन इच्छित स्थळी जातील.

२) गोविंद गार्डन राडने व्हिबगेर चौकातुन जी.के.गुरुकुल स्कुल समोरुन गोविंद गार्डन ब्रीज कडे जाण्या-येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** -गोविंद गार्डन रोडने जाणारी -येणारी वाहने व्हिबघेर चौकातुन जी.के.गुरुकुल स्कुल समोरुन गोविंद गार्डन ब्रीजकडे न जाता ती व्हिबगेर चौकातुन राईट मारुन कुणाल आयकॉन रोडने इच्छित स्थळी जातील.

### भोसरी वाहतूक विभाग अंतर्गत

१) पुणे नाशिक महामार्गावरील बोराडेवाडी चौक ते मातेरे हाऊस चौक या दरम्यानच्या रोडवर जाणा-या व येणा-या जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे

**पर्यायी मार्ग १ :- पुणे-नाशिक महामार्गावरील वाहने पांजरपोळ चौक किंवा भारतमाता चौकातुन इच्छितस्थळी जातील.**

**पर्यायी मार्ग २ :- मातेरे हाऊस चौकातील वाहने आरटीओ रोडने इच्छित स्थळी जातील.**

२) पुणे नाशिक महामार्गावरील मोशी चौक ते हवालदार वस्ती चौक या दरम्यानच्या रोडवर जाणा-या व येणा-या जड वाहनांना प्रवेश बंदी करणे

**पर्यायी मार्ग १ :- पुणे नाशिक महामार्गावरील वाहने भारतमाता चौकातुन इच्छितस्थळी जातील.**

Scanned with OKEN Scanner

**पर्यायी मार्ग २ :- हवालदार वस्ती कडुन येणारी वाहने ही देखील भारतमाता चौकातुन इच्छितस्थळी जातील.**

तरी वरील प्रमाणे दि.२०/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० ते १९:०० वा.पर्यंत वरील प्रमाणे वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील पोलीस, अग्निशामक, ॲम्ब्युलन्स तसेच निवडणुक प्रक्रियेत समाविष्ठ असलेली वाहने, वगळून) आवश्यकतेनुसार प्रवेश बंदी करण्यात येत असून अधिसुचना (नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी नमुद कालावधीत दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

17/11/2024.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **तळवडे,सांगवी,भोसरी** वाहतुक विभाग
/- वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटीग व बंदोबस्त लावून वाहतुक पर्यायी मार्गाने वळवावी.

Scanned with OKEN Scanner